This ad has been published in The Business Standard, (All Editions - Ahmedabad, Bangalore, Bhubaneswar, Mumbai, Kolkota, Chandigarh, Kochi, New Delhi, Hyderabad, Luknow, Chennai, Pune) and in The Free Press Journal (Mumbai Edition) on Friday, 3rd June, 2016

## हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड


नोंदणीकृत कार्यालय : युनिलिव्हर हाऊस, बी. डी. सावंत मार्ग, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९९.
सीआयएन : एल १५१४० एमएच १९३३ पीएलसी ००२०३० वेब : www.hul.co.in,
ई-मेल : levercare.sharehoder@unilever.com, दू. : + ९१-२२ ३९८३२२८५/३९८३२४५२


### वार्षिक सर्वसाधारण सभा, ई-व्होटिंगची माहिती आणि बुक क्लोझर तारखांची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीची ८३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम), गुरुवार ३० जून, २०१६ रोजी दु. ३.३० वा. कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात युनिलिव्हर हाऊस, बी. डी. सावंत मार्ग, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९९ येथे होणार आहे. एजीएमची सूचना, वार्षिक अहवाल आणि हजेरी पत्र, ज्यांनी त्यांच्या हार्ड कॉपीसाठी त्यांची विनंती नोंदवली नाही त्या कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंटस्कडे ई-मेल आयडीज नोंदवलेल्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवले आहे. एजीएमची सूचना, वार्षिक अहवाल आणि हजेरी पत्र यांची प्रत्यक्ष प्रत त्या सभासदांना पाठवली ज्यांनी त्यांचे ई-मेल आयडीज कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंटस्कडे नोंदवलेले नाहीत. कंपनीने २ जून, २०१६ रोजी सभासदांना ई-दळणवळण/वार्षिक अहवालांच्या प्रत्यक्ष प्रती पाठवणे पूर्ण केले आहे.

वार्षिक अहवालाची प्रत कंपनीची वेबसाईट : **www.hul.co.in** वर देखील उपलब्ध आहे. ज्या सभासदांना वार्षिक अहवाल मिळणार नाहीत ते कंपनीच्या वेबसाईटवरून डाऊनलोड करू शकतील किंवा त्याच्या एका प्रतिसाठी ते कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयांत कंपनी सेक्रेटरींना लेखी विनंती पाठवू शकतात किंवा वरील ई-मेल आयडीवर कळवू शकतात. वार्षिक सर्वसाधारण सभेत करावयाच्या कामकाजाच्या बाबींशी संबंधित दस्तावेज निरीक्षण करण्यासाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात कोणत्याही कामाच्या दिवशी कामाच्या वेळेत उपलब्ध असतील.

सभासदांना वार्षिक अहवालासोबत पाठवलेल्या एजीएमसाठी हजेरी पत्राद्वारे सभेच्या ठिकाणी प्रवेश नियंत्रित केले जातील. ज्या सभासदांना हजेरीपत्र इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मिळाले आहे त्यांनी कृपा करून हजेरीपत्र छापून घ्यावे आणि एजीएमला उपस्थित राहण्यासाठी त्या ठिकाणी असलेल्या रजिस्ट्रेशन काऊंटरवर रितसर भरलेले हजेरीपत्र सादर करावे.

**कृपया ध्यानांत ठेवावे की, प्रतिलिपी हजेरीपत्र जारी केले जाणार नाही.**

कंपनीला सभासदांना सभेच्या ठिकाणी असलेल्या टॅब्लेट/कॉम्प्युटरमार्फत ई-व्होटिंग व रिमोट ई-व्होटिंगसह इलेक्ट्रॉनिक माध्यमातून एजीएममध्ये पारित करावयाच्या प्रस्तावित ठरावांवर मत देण्याचा त्यांचा अधिकार बजावण्याकरिता सुविधा पुरवितांना आनंद होत आहे, सभेच्या ठिकाणापेक्षा वेगळ्या कोणत्याही जागेतून इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सिस्टीमवर सभासद त्यांची मते देऊ शकतात. (रिमोट ई-व्होटिंग), रिमोट ई-व्होटिंगची सुविधा पुरविण्याकरिता कंपनीने मे. कार्व्ही कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड (कार्व्ही) शी व्यवस्था करार केला आहे.

रिमोट ई-व्होटिंग कालावधी रविवार २६ जून, २०१६ रोजी सकाळी ९.०० वा. सुरु होईल आणि बुधवार २९, जून, २०१६ रोजी सं. ५.०० वा. संपेल. बुधवार २९ जून, २०१६ रोजी सं. ५.०० वा. मतदानासाठी रिमोट ई-व्होटिंग मॉड्युल निष्क्रीय करण्यात येईल. भागधारकाने एकदा का एखाद्या ठरावावर मत दिले की, त्यानंतर भागधारक त्यामध्ये बदल करू शकणार नाही.

कट ऑफ डेट असलेल्या गुरुवार २३ जून, २०१६ रोजी सभासदांनी धारण केलेल्या समभागांच्या संख्येच्या प्रमाणे मतदान अधिकार ठरतील. कट-ऑफ डेट रोजीस जर सभासद समभाग धारण करत असतील तर ते केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मत देण्यास पात्र ठरतील. जे सभासद वार्षिक अहवाल पाठवल्यानंतर आणि बुक क्लोजरपूर्वी समभाग संपादित करतील ते **evoting@karvy.com** किंवा **levercare.sharehoder@unilever.com,** वर एक विनंती पाठवून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सिस्टीममार्फत मतदानाची सुविधा एजीएममध्ये देखील उपलब्ध करून दिली जाईल आणि ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगने त्यांचे मत दिलेले नसेल ते एजीएमला उपस्थित असणारे सभासद एजीएममध्ये मत देण्यास पात्र असतील. ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारा त्यांचे मत दिले आहे ते सभासद एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना सभेत पुन्हा मतदान करू दिले जाणार नाही.

एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट : **www.hul.co.in** वर आणि कार्व्हीची वेबसाईट : **https://evoting.karvy.com** वर उपलब्ध आहे. इलेक्ट्रॉनिक मतदानाची प्रक्रिया ८३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत तसेच कार्व्हीने सभासदांना पाठवलेल्या ई-मेल मध्येही उपलब्ध आहे. ई-व्होटिंगच्या संबंधात कोणत्याही चौकशा/तक्रारींच्या बाबतीत तुम्ही कार्व्हीची ई-व्होटिंग वेबसाईट : **https://evoting.karvy.com** च्या डाऊनलोड सेक्शनमध्ये उपलब्ध सभासदांसाठी फ्रिक्वेंटली आस्कड क्वेश्चन्स' (एफएक्युज) आणि सभासदांसाठी 'ई-व्होटिंग युजर मॅन्युअल' चा संदर्भ घेऊ शकतात किंवा श्री. राजेंद्र प्रसाद, मॅनेजर, कार्व्ही कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी त्यांच्या पत्त्यावर कार्व्ही सेलेनीयम, टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गाचीबोवली फायनान्शिअल डिस्ट्रीक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद-५०००३२ येथे किंवा निर्धारित ई-मेल आयडी : **evoting@karvy.com** किंवा दूरध्वनी क्र. : ०४०-६७१६१५१० किंवा टोल फ्री नंबर : १-८००-३४५४-००१ येथे संपर्क साधू शकतात.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ च्या तरतुदींनुसार कंपनीची सभासदांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तके शुक्रवार २४ जून, २०१६ पासून गुरुवार ३० जून, २०१६ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेडसाठी
देव बाजपई
एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, (लिगल अँण्ड कॉर्पोरेट अफेअर्स)
अँण्ड कंपनी सेक्रेटरी

दिनांक : ०२.०६.२०१६
ठिकाण : मुंबई

टीप : एजीएममध्ये हजर राहून मत देण्यास हक्कदार असलेला सभासद त्याच्या/तिच्यावतीने हजर राहून मत देण्याकरिता एका प्रतिपत्रीची नेमणूक करण्यास देखील हक्कदार असेल व प्रतिपत्रीने कंपनीचा सभासद असणे आवश्यक नाही.